**महाराष्ट्र शासन**
**(ग्राम विकास विभाग)**
**जिल्हा परिषद, सोलापूर अंतर्गत गट-क मधील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीची जाहिरात**
**पदभरती सन २०१९**
**जाहिरात शुध्दीपत्रक क्रमांक-०१/२०१९ दिनांक ०३/०३/२०१९**

**या कार्यालयाद्वारे जिल्हा परिषद, सोलापूर अंतर्गत गट –क या संवर्गातील रिक्त पदे ऑनलाईन पध्दतीने भरण्याकरीता जाहिरात दैनिक लोकमत, दैनिक दिव्यमराठी व दैनिक संचार या मराठी वृत्तपत्रामध्ये तसेच जिल्हा परिषदेच्या www.zpsolapur.gov.in व शासनाच्या www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर दि.०३ मार्च २०१९ ला प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यामध्ये स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदाची शैक्षणिक अर्हता खालील प्रमाणे नमुद करण्यांत आलेली आहे.**

| अ.क्र. | पदाचे नांव | वेतन श्रेणी | शैक्षणिक अर्हता व अनुभव | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | **स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक** | **वेतन बँड ५२०० – २०२०० ग्रेड वेतन २४००/-** | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील, आणि स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाचा एक वर्षाचा पाठयक्रम परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार किंवा संविधीमान्य तत्सम खालील पाठयक्रम<br>१) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या एक वर्षाचा पाठयक्रम उत्तीर्ण किंवा<br>२) आर्किटेक्चरल ड्रॉफ्टसमन (वास्तुशास्त्रीय आरेखक ) किंवा<br>३) कन्स्ट्रक्शन सुपरवाझर ( बांधकाम पर्यवेक्षक)<br>४) सैनिकी सेवेतील बांधकाम पर्यवेक्षकाचे अनुभव प्रमाणपत्र.<br>किंवा स्थापत्य अभियांत्रिकीमध्ये पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी स्थापत्य मध्ये धारण करीत असणारे उमेदवार पात्र असतील.<br>परंतु ज्यांनी १९८०-८१ ते १९८६-८७ च्या दरम्यान तंत्र शिक्षण विभागाच्या शासकीय तांत्रिक संस्थेकडून घेण्यात येणारी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाची एक वर्षे मुदतीची पाठयक्रम परीक्षा उत्तीर्ण केलेली आहे. अशा उमेदवारांच्या बाबतीत शासकीय तंत्र शिक्षण विभागाकडील त्यांच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीच्या अधीन राहून वयोमर्यादा ४७ वर्षे इतकी शिथिल करता येईल. | |

**वरील नमुद रकाना क्रमांक ४ मधील शैक्षणिक अर्हता व अनुभव या ऐवजी खालील प्रमाणे रकाना क्र.४ स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदाच्या शैक्षणिक अर्हतेबाबत सुधारणा करण्यांत येत आहे.**

| अ.क्र. | पदाचे नांव | वेतन श्रेणी | शैक्षणिक अर्हता व अनुभव | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | **स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक** | **वेतन बँड ५२०० – २०२०० ग्रेड वेतन २४००/-** | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील, आणि स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाचा राज्य सरकारच्या शासकीय तांत्रिक शिक्षण विभागाने आयोजित केलेल्या एक वर्षाचा पाठयक्रम परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार किंवा खालील ५ पाठयक्रम<br>१) किमान स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यकाची एक वर्ष मुदतीची पाठयक्रम परीक्षा उत्तीर्ण ही अर्हता किंवा शासनाने वेळोवेळी समतुल्य घोषित केलेली अर्हता.<br>२) आर्किटेक्चरल ड्रॉफ्टसमन (वास्तुशास्त्रीय आरेखक )<br>३) कन्स्ट्रक्शन सुपरवाझर ( बांधकाम पर्यवेक्षक)<br>४) आरेखक (स्थापत्य)<br>५) सैनिकी सेवेतील कन्स्ट्रक्शन सुपरवाझर अनुभवाचे प्रमाणपत्र<br>किंवा स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाची एक वर्ष मुदतीची पाठयक्रम परीक्षा उत्तीर्ण ही अर्हता किंवा शासनाने वेळोवेळी समतुल्य घोषित केलेली अर्हता, स्थापत्य अभियांत्राकी मधील पदविकाधारक /पदवीधारक/ पदव्युत्तर अशी उच्च शैक्षणिक अर्हता प्राप्त असलेले उमेदवार देखील पात्र राहतील. | |

**सही/-**
**(पी.एम.राऊत)**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्र.)**
**जिल्हा परिषद,सोलापूर**

**सही/-**
**(डॉ.राजेंद्र भारुड ) भाप्रसे**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,सोलापूर**